देशदूत
पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. एन.एस.के./ ५५/२०२४-२६ आर.एन.आय. नंबर : १८९१८/१९७०.
नाशिक । गुरुवार, दि. १७ जुलै २०२५

आजचे कार्यक्रम

* जनसुरक्षा कायद्याविरोधात नाशिक शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीची निदर्शने.
वेळ : सकाळी १० वाजता.
ठिकाण : काँग्रेस भवन, नाशिक.

* सावानाच्या वतीने नाट्यधारा उपक्रमाचा शुभारंभ
वेळ : सायंकाळी ५ वाजता
ठिकाण : प. सा. नाट्यगृह.

ओरिजन दंतचिकित्सालय रुग्णसेवेत

नाशिक । येथील ओरिजन दंतचिकित्सालयाचे उद्घाटन कृषि मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते करण्यात आले.

प्राइमा कासा अपार्टमेंट्स, म.वि.प्र. कृषी महाविद्यालयासमोर, गंगापूर रोड येथे अत्याधुनिक सुविधायुक्त क्लिनिक डॉ. प्राजक्ता कराड आणि डॉ. केयूर कराड यांच्या कुशल नेतृत्वाखाली रुग्णसेवेत रुजू झाले. याप्रसंगी खासदार भास्कर भगरे, अनिल आहेर, मुकुंद कराड, भारती कराड, विजय खाडे, जयदेव गुप्ता, कोंडाजी आव्हाड, हेमंत धात्रक, सुधीर कराड, संजय भावसार, संजय होळकर उपस्थित होते. अत्याधुनिक इंट्रा-ओरल स्कॅनर, चेसा ओटू, डेंटल चेअर, अलाइनर्स, मेटल ब्रेसेस,सिंगल सिटिंग रूट कॅनल ट्रीटमेंट, डेन्टल इम्प्लांट्स,फिक्स्ड आणि रिमूव्हेबल डेन्चर, क्राउन आणि ब्रिज, वेदनरहित एक्सट्रॅक्शन्स, टूथ व्हाइटनिंग, गम सर्जरी, व्हिनियर्स आणि स्माईल डिझायनिंग, किड्स डेंटिस्ट्रीइत्यादी सुविधा येथे उपल्बध आहेत.

सह्याद्री हॉस्पिटलचे डॉ. कैचे ठरले 'फॅमिली हार्ट सर्जन'

नाशिक । प्रतिनिधी

उत्तर महाराष्ट्रातील आघाडीचे हृदय शल्यचिकित्सक आणि नाशिकच्या सह्याद्री सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील कार्डियोव्हॅस्क्युलर सर्जरी विभागाचे प्रमुख डॉ. राहुल कैचे यांनी एकाच कुटुंबातील रुग्णांच्या हृदय शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या केल्या आहेत.

गेल्या काही वर्षांत डॉ. कैचे यांनी हा पल्ला गाठत 'फॅमिली हार्ट सर्जन' म्हणून नवी ओळख मिळवली आहे. उपाध्यक्ष संजय चावला यांनी डॉ. राहुल कैचे यांच्या कामगिरीचे कौतुक करताना सांगितले की, आतापर्यंत साडेबारा हजारांहून अधिक हृदय शस्त्रक्रिया यशस्वीपणे करणाऱ्या डॉ. कैचे यांच्या यशस्वीतेचे प्रमाण ९९.५६ टक्के आहे.

'उत्तर महाराष्ट्राचे आपले हक्काचे रुग्णालय' असे ब्रीदवाक्य असलेल्या सह्याद्री हॉस्पिटलने अत्याधुनिक तंत्रज्ञान व अनुभवी डॉक्टर यांच्या मदतीने रुग्णसेवा क्षेत्रात आघाडी घेतली आहे. दोन कॅथलॅब्स तसेच सर्व आवश्यक उपचार सुविधांमुळे रुग्णांना उत्कृष्ट उपचार मिळवणे सुलभ झाले आहे. डॉ. राहुल कैचे यांनी भारत आणि परदेशातील मोठ्या हॉस्पिटल्समध्ये सेवा दिली आहे. त्यांचा अनुभव आणि अनेक जटिल हृदय शस्त्रक्रियांच्या यशामुळे ते उत्तर महाराष्ट्रातील रुग्णांसाठी एक विश्वासार्ह आणि आदर्श डॉक्टर बनले आहेत.

> शस्त्रक्रियेत रुग्णाच्या छातीतील शुद्ध रक्तवाहिन्या वापरल्या जातात. यामुळे रक्ताचा प्रवाह अधिक चांगला होऊन, शस्त्रक्रिया अधिक यशस्वी होते. या प्रकारच्या शस्त्रक्रियेनंतर रुग्णांच्या नवीन रक्तवाहिन्यांमध्ये ब्लॉकेजेसचे प्रमाण फारच कमी असू शकते. अशाप्रकारे रुग्णांची काळजी घेणारी आणि विश्वासार्ह सेवा दिल्यामुळे त्यांचा माझ्यावर असलेला विश्वास अधिक दृढ झाला आहे.
> - डॉ. राहुल कैचे

मानसिक तणावातील कामगाराचा जीव वाचविला

नाशिक । व्यावसायिक संकुलाच्या पाचव्या मजल्यावरुन उडी मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या तरुणाला वाचविण्यात अग्निशमन दलासह पोलिसांना यश आल्याची घटना कॉलेजरोड परिसरात बुधवारी दुपारी घडली. योगेश मनोहरराम चौधरी (रा. पाथर्डी फाटा) असे तरुणाचे नाव असून, मानसिक तणावातून त्याने आत्महत्येचा प्रयत्न केल्याचा पोलिसांना संशय आहे. तासाभराने बचाव कार्य यशस्वी झाले.

योगेश चौधरी हा कामगार असून त्याची बहीण राजस्थान पोलीस दलात कार्यरत आहे. तो कॉलेजरोड भागातील पेट्रोलपंपाशेजारी असलेल्या व्यावसायिक संकुलाच्या पाचव्या मजल्यावर फर्निचरचे काम करीत होता. दुपारी चार वाजेच्या सुमारास इमारतीच्या गच्चीवर जात त्याने खाली उडी मारण्याचा प्रयत्न केला. गच्चीवरील भिंतीवर उभा असलेल्या योगेशला बघितल्यानंतर नागरिकांनी पोलिसांना माहिती दिली. सहायक निरीक्षक निखिल पवार यांच्या पथकासह अग्निशमन दलाचे पथक दाखल झाले. इमारतीखाली जाळी धरून तरुणाशी चर्चा करुन इमारतीच्या गच्चीवर पोलीस पोहोचले. त्याची मनधरणी करुन खाली उतरवून समुपदेशन करत ताब्यात घेतले. योगेश हा काही महिन्यांपासून मानसिक तणावात असून, यापूर्वीही त्याने आत्महत्येचा प्रयत्न केल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान, तरुणाकडे बघून व्यावसायिक संकुलातील कर्मचारी, महाविद्यालयीन तरुणतरुणींनी थट्टा उडविल्याचे दिसून आले. पोलिसांनी काहीसा ओरडा देताच बघ्यांनी काढता पाय घेतला.

ठाकरेंना सत्तेचं आवतण

पान १ वरून – विधान परिषद सदस्य, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह अनेक नेत्यांची भाषणे झाली. या सर्वांनी अंबादास दानवे यांच्या कामगिरीचा गौरव केला. यावेळी विधान परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंना थेट ऑफर दिली.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले,अंबादास दानवे यांचा आज निरोप समारंभ आहे. आमच्या शुभेच्छा आहेत. त्यांनी पुन्हा या समारंभात यावे. आल्यानंतर त्याच पदावर असे काही नाही. मी असे म्हटल्यावर हे म्हणतील की पळवापळवी करतोय म्हणून. उद्धवजी! आता उद्धवजी २०२९ पर्यंत काही स्कोप नाही. आम्हाला तिकडे यायचा स्कोप उरला नाही. तुम्हाला इकडे यायचा स्कोप... विचार करता येईल. त्याचा विचार आपण वेगळ्या पद्धतीने करु. पण आम्हाला तिकडे यायचा स्कोप हा उरलेला नाही.

'तुकडेबंदी'साठी समिती

पान १ वरून – आणि संचालक भूमी अभिलेख, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, संचालक (नगररचना), सह/उपसचिव (विधी व न्याय विभाग) यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त महाराष्ट्र जमीन महसूल न्यायाधिकरण येथील सदस्य (प्रशासकीय) राजेंद्र क्षीरसागर आणि सेवानिवृत्त संचालक (नगररचना) एन. आर. शेंडे हे निमंत्रित सदस्य म्हणून मार्गदर्शन करतील.

'गोष्ट रिझर्व्ह बँकेची' पुस्तकाचे प्रकाशन

नाशिक । प्रतिनिधी

राज्य सहकारी बँकेचे प्रशासक, ज्येष्ठ सहकार व बँकिंग तज्ज्ञ विद्याधर अनास्कर यांनी लिहिलेल्या 'गोष्ट रिझर्व्ह बँकेची' या पुस्तकाचे प्रकाशन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले.

विधानभवनातील मंत्रिमंडळ सभागृहात आज आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त आयोजित बैठकीपूर्वी पुस्तकाचे प्रकाशन झाले. याप्रसंगी राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ, गृहनिर्माणमंत्री अतुल सावे, पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे, मत्स्य व बंदरे विकासमंत्री नितेश राणे, सहकार राज्यमंत्री पंकज भोयर व राज्याचे मुख्य सचिव राजेशकुमार उपस्थित होते.

रिझर्व्ह बँकेचा इतिहास गोष्टरूपाने स्थानिक भाषेमध्ये विशद केलेले हे भारतातील पहिले पुस्तक ठरावे. यामध्ये सर वॉरेन हॅस्टिंग्सच्या काळापासून मध्यवर्ती बँकेची संकल्पना, त्याचा प्रवास, रिझर्व्ह बँकेचे बोधचिन्ह, रिझर्व्ह बँकेचे नामकरण इत्यादीपासून १९८२ पर्यंतचा इतिहास गोष्टरूपाने मांडलेल्या एक्कावन्न प्रकरणांचा समावेश पुस्तकात आहे. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांची प्रस्तावना पुस्तकास लाभली असून, पुणे येथील राजहंस प्रकाशन या प्रकाशन क्षेत्रातील प्रसिद्ध संस्थेने हे पुस्तक प्रकाशित केले आहे.

स्कोडा ऑटोचा महत्त्वपूर्ण टप्पा

नाशिक । स्कोडा ऑटो या आघाडीच्या वाहन कंपनीने २०२५ च्या पहिल्या सहामाहीत आतापर्यंतची सर्वोच्च सहामाही विक्री करत महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे.

कंपनीने देशभरात विस्तार वाढवून ग्राहकांना अधिकाधिक सेवा देण्याचा प्रयत्न केला आहे. ३०० वाहनांची विक्री कमी कालावधीत झाली आहे. विस्तारीकरणासह बाजारपेठांमधील गरजांची पूर्तता केली जात आहे. कुशक व कोडियकसह स्कोडा ऑटो इंडियाकडे आता प्रत्येकासाठी एसयूव्ही आहे. स्लाव्हियाने स्कोडा ऑटोचा भारतातील सेदान वारसा कायम ठेवला आहे, तसेच लवकरच देशामध्ये जागतिक आयकॉनचे अनावरण करण्यात येणार असल्याचे ब्रँड संचालक आशिष गुप्ता यांनी सांगितले.

सप्तशृंग घाटातील प्रवास 'भगवती भरोसे'

पान १ वरून – धोकादायक स्थिती आहे.यामुळे अपघाताची शक्यता आहे. देवीच्या दर्शनाची आस घेऊन निघालेल्या भाविकांना सुरक्षेअभावी घाटातील प्रवास 'भगवती भरोसे' करावा लागत असल्याची वस्तुस्थिती आहे.

गडावर आगामी नवरात्रोत्सव, दसरा, कोजागिरी पौर्णिमा, दिवाळी सुट्या, तसेच इतर दिनविशेष दरम्यान भाविकांचा सतत राबता असणार आहे. यात्रा काळात २०ते २५ लाख भाविकांची हजेरी गडावर असते. यात्रा काळात खासगी वाहनांना प्रवेश बंदी असली तरी इतरवेळी खासगी वाहनांची रहदारी गडावर मोठ्या प्रमाणात आहे. सध्या आषाढ मास सुरू असल्याने देवीच्या दर्शनासाठी मंगळवार, शुक्रवार या दिवशी प्रचंड गर्दी आहे. शनिवार, रविवार या दिवशीही भाविकांची गर्दी वाढलेली आहे. त्यामुळे घाटातून जाणाऱ्या वाहनांची संख्या अधिक आहे. रखडलेल्या कामामुळे वाहनचालकांचा गोंधळ उडत आहे. त्यात खबरदारीच्या सूचना देणाऱ्या फलकांचा अभाव असल्याने वाहनचालकांना अंदाजे मार्गक्रमण करत पुढे सरकावे लागते. रस्ता काँक्रिटीकरणाचे काम जागोजागी अर्धवट असल्याने तसेच त्यांच्या लोखंडी सळ्या बाहेर आल्याने वाहनचालकांना घाटाच्या दरीच्या बाजूने डांबरी रस्त्यांच्या एका लेनवरून वाहने चालवत घाट उतरावा लागतो. डांबरी रस्त्यांवर अस्तर उखडलेले आहे. जागोजागी खड्डे पडलेले. काँक्रीटीकरण कामामुळे त्याच्या दुरूस्तीचे काम होत नाही. कथड्याकडील भराव खचलेला आहे.यामुळे वाहनांना अपघात होण्याची शक्यता असल्याची प्रतिक्रिया वाहनचालकांनी दिली.

मे महिन्यापासून सप्तश्रृंगघाटात ९ किलोमीटर अंतरादरम्यान ४० कोटी रुपये खर्चून बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, महावितरण या विभागाकडून रस्त्याचे काँक्रिटीकरण, सुरक्षा कथड्यांची व्यवस्था, कोसळणाऱ्या दरडींना अटकाव घालणाऱ्या संरक्षक जाळ्या बसवणे आदी कामे करण्यात येत आहेत.मात्र, पावसाने मे महिन्यापासूनच हजेरी लावलेली आहे. त्यात गडावर कोसळणारा पाऊस इतर भागापेक्षा सर्वाधिक असतो. दिवसा धुक्यामुळे विकासकामांना खीळ बसल्याचे शासकीय अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. मात्र, असे असले तरी, कामे करत असताना भाविकांच्या सुरक्षेकडे घाटात दुर्लक्ष झाल्याची तक्रार वाहनचालक, भाविक करताना दिसत आहे. कारण घाटात अवघड वळण, तुटलेले कथडे, कोसळणारे दगड आदी धोकादायक ठिकाणांना सूचना किंवा खबरदारी घेणाऱ्या फलकांची गरज आहे.

शेअर बाजार

सेन्सेक्स	
८२,६३४	(+६४)
निफ्टी	
२५,२१२	(+१६)

स्थानिक भाव

सोने (प्रति १० ग्रॅम)	
२४ कॅरेट	९७५००
२२ कॅरेट	८९७००
चांदी (प्रति किलो)	
१११५००	

बाजारभाव

कालचे कांदा भाव

	आवक (क्विं.)	किमान	कमाल	सरासरी
लासलगाव	१८०७४	६००	२११२	१५००
विंचूर	१५८७२	६००	१८१५	१५००
निफाड	६१५०	५००	१५५१	१४००
सायखेडा	४५३०	७००	१८५७	१३७५
पिंपळगाव	१६५००	७५०	२१००	१४००

लासलगावला कांदा आवक वाढ

नाशिक । प्रतिनिधी

लासलगाव बाजार समितीत कांद्याची सुमारे १८ हजार क्विंटल कांदा आवक झाली. त्यामुळे सरासरी दरात किंचित घट झालेली होती. पिंपळगाव उपआवारात १६ हजार , पिंपळगाव बसवंत बाजार समितीत १६ हजार ५०० क्विंटल कांदा आवक झाली. पाऊस उघडल्यामुळे कांद्याच्या आवकेत वाढ झाल्याचे चित्र होते.

यार्डात मेथीच्या दरात घसरण

नाशिक । प्रतिनिधी

पावसाने उघडीप दिल्याने नाशिकच्या मुख्य मार्केट यार्डात पालेभाज्यांची प्रामुख्याने मेथीच्या जुड्यांची आवक वाढली आहे.त्यामुळे मेथी लिलावात प्रतवारीनुसार १५०० ते ३००० रुपये प्रतीशेकडा दराने विक्री झाली.

कोथिंबिरीच्या जुड्यांची दिवसाला संध्याकाळच्या सत्रात ५० ते ५५ हजार जुडी आवक होत आहे. गावडी आणिहायब्रीड प्रकारानुसार त्यांना लिलावात ५०० ते ३००० रुपये शेकडा दर मिळत आहे. मेथीच्या एका जुडीला किरकोळ बाजारात २० ते २५ रुपये दर आहे. तर कोथिंबिर १० ते ३० रुपये जुडीप्रमाणे विक्री होत आहे.

खासगी शिकवणी अधिनियम तयार करणार

पान १ वरून – पवार गटाचे आमदार हिरामण खोसकर यांनी याबाबत तारांकित प्रश्न विचारला होता. त्यावेळी बोलताना भुसे म्हणाले, या अधिनियमाचा मसुदा तयार करण्याचे काम प्रगतीपथावर असून संबंधित नियमावलीची आखणी देखील सुरू आहे.या अधिनियमाच्या मसुद्याबाबत सदस्यांकडून सकारात्मक सूचना आल्यास सुचवलेल्या मुद्द्यांचा समावेश करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

शालेय साहित्य खरेदीसाठी नियमावली

राज्यातील काही शाळांकडून विद्यार्थ्यांना गणवेश, वह्या, पाठ्यपुस्तके आणि शालेय साहित्य ठराविक दुकानातून किंवा विक्रेत्याकडून खरेदी करण्यास भाग पाडले जात असल्याच्या तक्रारी येत आहेत. या पार्श्वभूमीवर शालेय साहित्य खरेदीबाबत लवकरच नियमावली तयार करण्यात येणार असल्याची माहिती दादा भुसे यांनी अन्य एका प्रश्नाच्या उत्तरात दिली. याबाबत भाजपच्या आमदार अमोल जावळे यांनी प्रश्न उपस्थित केला होता.

सुरक्षेसाठी गुंतवणूक आवश्यक

पान १ वरून – पाकिस्तानने निशस्त्र ड्रोनचा वापर केला. बहुतेक ड्रोन पाडण्यात आले. ते आपल्या कोणत्याही लष्करी किंवा नागरी पायाभूत सुविधांना कोणतेही नुकसान पोहोचवू शकले नाहीत. मला वाटते की ड्रोन उत्क्रांतीवादी आहेत आणि युद्धात त्यांचा वापर खूप क्रांतिकारी झाला आहे. त्यांची तैनाती आणि व्याप्ती वाढत असताना, सैन्याने क्रांतिकारी पद्धतीने ड्रोनचा वापर केला. आपण लढलेल्या अनेक युद्धांमध्ये तुम्ही हे पाहिले असेल. ते पुढे म्हणाले, आपण आयात केलेल्या तंत्रज्ञानावर अवलंबून राहू शकत नाही, कारण ते आपल्या युद्ध आणि संरक्षण कार्यांसाठी महत्त्वाचे आहे. परदेशी तंत्रज्ञानावर अवलंबून राहिल्याने आपली तयारी कमकुवत होते. उत्पादन वाढवण्याची आपली क्षमता कमी होते. यामुळे महत्त्वाच्या यांत्रिक भागांची कमतरता निर्माण होते. यावेळी चौहान यांनी भविष्यातील हवाई मार्गाने येणाऱ्या धोक्यांना प्रभावीपणे निष्प्रभ करण्यासाठी कायनेटीक आणि नॉन कायनेटीक प्रतीकारात्मक उपाययोजनांवर मोठ्या प्रमाणात भर देण्याचे आवाहन केले. तसेच ड्रोन आणि ड्रोनविरोधी तंत्रज्ञानाचे स्वदेशीकरण करण्याचे महत्त्व पुन्हा एकदा स्पष्ट केले.

इस्रायलचा सीरियाच्या संरक्षण मंत्रालयावर हल्ला

पान १ वरून – सीरियाच्या सरकारी वृत्तवाहिनी इलेखबारिया टीव्हीने वृत्त दिले आहे की इस्रायली हल्ल्यात दोन नागरिक जखमी झाले आहेत. इस्रायली सैन्याने म्हटले आहे की, आम्ही दमास्कसमधील सीरियन राजवटीच्या लष्करी मुख्यालय संकुलाच्या प्रवेशद्वारावर हल्ला केला आहे. सीरियाच्या सरकारी माध्यमांनी बुधवारी वृत्त दिले की, इस्रायलने प्रामुख्याने स्वैदा शहराला लक्ष्य केले. सोमवारी ड्रुझ लढाऊ आणि बेदौइन सशस्त्र गटांमधील लढाई दडपण्यासाठी सरकारी सैन्याने शहरात प्रवेश केला, तेव्हा हा संघर्ष सुरू झाला.

शब्दकोडे :३०३



आडवे शब्द : १) ताजा, प्रफुल्लीत. ४) निघून जाणे, प्रस्थान करणे. ७) चौदा वर्ष वनवास भोगणारा कौसल्या पुत्र. ८) श्री विष्णूचे एक नाव. ९) हत्ती. १०) वस्तू वा पदार्थाचा निघालेला तुकडा. १२) वेगळा. १३) श्रीकृष्ण सखी. १४) मला. १५) हनुमानाचे एक विशेषण. १७) गंध. १८) पाणी. २०) अरण्य. २१) अवयव, इंद्रिय. २२) शंभर शेर. २३) वेल. २४) मान्यतेचा शब्द. २५) नवरा. २६) लोणी (हिं.) २७) जाणे-येणे. २८) पुरुष. ३०) रक्षा. ३२) मान, प्रतिष्ठा. ३३) मनाला टोचणारे दुःख. ३४) दालचिनी. ३५) नविन, नुतन. ३६) ओरखडा. ३७) औषध (हिं). ३८) पोपट. ४०) सरोवर. ४२) एकूण एक, सर्व. ४४) देश (हिं.). ४७) गाजावाजा. ४९) जेंव्हा, ...यदा ही धर्मस्य ५०) धट्टा-कट्टा, निरोगी. ५२) केंव्हा (ग्रा.). ५३) चेहऱ्यावरील तेज. ५४) वाकडा नसलेला. ५५) एक शेंग भाजी. ५८) उत्सव. ५९) पायजमा. ६०) ताण ***. ६४) गाय. ६६) रत्न. ६७) सर्वस्व. ६८) घर.

उभे शब्द : १) गोंधळ, अव्यवस्था. २) शूर. ३) मसाल्यातील पान. ४) वेग. ५) देवीचा महोत्सव. ६) मातीचा कण. ७) राजकारभाराचे प्रमुख शहर. ९) फणसातील गर. ११) भार, वेट (मराठी) १२) प्रवीण. १६) नमन. १७) पृथ्वी भोवतीचे हवेचे आवरण. १९) खोडण्याचे साधन. २१) गावठी, गावात तयार झालेले. २३) मध्यस्थ. २८) एक पौराणिक जोडपे. २९) लाजणारा ३१) मावा. ३२) हात. ३६) रुची, स्वाद. ३९) छोटे वादळ. ४१) चटकन, त्वरीत. ४२) तेंव्हा (ग्रा). ४३) उंच व कृष. ४५) अंधार. ४६) अभिनेता. ४८) रानरेडा. ५१) मासा. ५३) सोने. ५५) गणपतीचे एक नाव. ५६) प्रहार. ५७) आखलेला बेत. ६१) मुसलमान. ६३) नवरदेव. ६५) द्रव्य, पैसा.

शब्दकोड३०२चे उत्तर



देशदूत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि. यांच्याकरिता प्लॉट क्र. बी ६४, नाईस, सातपूर, नाशिक - ४२२००७ येथे मुद्रित करून देशदूत कार्यालय, काँग्रेस हाऊस, म.गांधी रोड, नाशिक येथे प्रसिद्ध केले.
● संपादक : **हेमंत दिनेश अलोने.** ● सल्लागार संपादक : * **शैलेंद्र माणिकराव तनपुरे** (* पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) ✆ : शहर- ०२५३-२५७५७१६, २५७२४०० ● नाशिकरोड कार्यालय :०२५३-२९४२२०३
● मालेगाव कार्यालय फोन: ०२५५४-२९९२०३ ● सिन्नर फोन: ०२५५१-२९९२०३, ● दिंडोरी फोन : ०२५५७-२२२८८८ ● निफाड फोन : ०२५५७-२९९६९६. ● Mail id : ceditor@deshdoot.com